| | Subject –भूगोल | Model Answer<br>Set – 1 |
|---|---|---|

प्र.१ **(अ) दिलेल्यापर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा:**

१) अ) पॅटाना   २) ड) कॉफी   ३) ब) १९४७   ४) अ) विकसनशील

प्र.२ **योग्य जोड्या जुळवा.**

| ‘अ’ गट (प्रदेश) | | ‘ब’ गट (प्राणी) | |
|---|---|---|---|
| १) | २१-४० | अ) | अंदमान आणि निकोबार |
| २) | ८१-१०० | ब) | दिल्ली |
| ४) | ६१-८० | क) | दिव आणि दमण |
| ४) | ४१-६० | ड) | दादरा नगरहवेली |

प्र.३ **एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही - ४)**

१) भारतातील नागरीकरणाचा कल २०११ साली ३१.२% होता.

२) भारताचे स्थान उत्तर व पूर्व गोलार्धात आहे.

३) गियाना उच्चभूमी व ब्राझील उच्चभूमी अशी उच्चभूमीची नावे आहे.

४) भारतात जून ते सप्टेंबर महिन्यात पावसाळा असतो.

५) ब्राझीलच्या किनाऱ्याजवळ उष्ण व थंड प्रवाह वाहतात.

प्र.४ **(अ) नकाशाचे काळजीपूर्वक वाचन करुन खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.(कोणतेही चार)**

| | दिशा | शेजारचे देश / महासागर |
|---|---|---|
| १) | उत्तर | व्हेनेझुएला, गियाना, फ्रेंच, मियान |
| २) | दक्षिण | उरुग्वे |
| ३) | पूर्व | एकही देशाची सीमा लागत नाही. |
| ४) | पश्चिम | बोलिव्हिया, पराग्वे |
| ५) | पूर्व | अटलांटिक महासागर |
| ६) | | नकाशा आपल्याला ब्राझीलच्या राजकिय बद्दल माहिती देतो. |

**(ब) भारताच्या नकाशात खालील बाबी भरा. (कोणतेही चार)**




**प्र.५ खालील विधानांची भौगोलिक कारणे लिहा. (कोणतेही - २)**

१) १) देशाच्या विकासासाठी वाहतुकमार्गाची गरज असते.

२) वाहतूक मार्गामुळे निरनिराळ्या उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल मजूर व यंत्रसामग्री पुरवता येते.

३) पक्का माल, बाजारपेठा किंवा ग्राहकांपर्यंत पोहचवण्यासाठी वाहतूकमार्ग उपयुक्त ठरतात.

४) वाहतुकीच्या मार्गामुळेच देशातील व परदेशातील लोक एकत्र येतात. त्यांच्यात विचारांची देवाण-घेवाण होते व सहकार्य वाढते.

५) नैसर्गिक आपत्ती व देशाच्या संरक्षणासाठी वाहतूकमार्ग जीवनरेषेचे काम करतात.

६) वाहतुकमार्गाचे जाळे जितके दाट तितका आर्थिक विकास जास्त.

२) १) गंगेच्या मुखाकडील भागात कोळसा व खजिनांची उपलब्धता, स्वस्त व मुबलक मजूर आणि विस्तृत बाजारपेठ आहे.

२) या मैदानी प्रदेशात शेतीशी संबंधित उद्योग आहेत.

३) कोलकता – हुगळी हे उत्तर भारतीय मैदानी प्रदेशातील प्रमुख औद्योगिक क्षेत्र आहे.

४) या सर्व कारणांमुळे गंगेच्या मुखाकडील भागात मैदानी प्रदेशाच्या औद्योगिक विकास झाला आहे.

३) १) हिवाळ्यात कमी तापमानामुळे भारताच्या वायव्य भागात जास्त वायुदाब निर्माण होतो.

२) दक्षिणेकडे वायुदाब कमी होत जातो.

३) जास्त वायुदाबामुळे हिंदी महासागरावरील कमी दाबाच्या प्रदेशाकडे वारे वाहतात.

४) हे वारे आपल्या उजवीकडे वळतात व ते ईशान्यकडून नैऋत्यकडे वाहतात त्यांना ईशान्य मान्सून वारे म्हणतात.

५) हे वारे बंगालच्या उपसागरा वरून वाहताना बाष्पयुक्त होतात व आंध्रप्रदेश व तामिळनाडूच्या पूर्व किनाऱ्यावर

पाऊस देतात.

४) ब्राझील मध्ये वन्य प्राण्याची बेकायदेशीर तस्करी केली जात आहे. स्थलांतरित शेती केल्यामुळे जंगलतोड केली जात आहे. म्हणजेच प्राण्याचे निवासस्थान कमी होत आहे. त्याच बरोबर प्रदूषण खुप मोठ्या प्रमाणात होत आहे. अशा या समस्यांमुळे स्थानिक वन्य प्राण्याच्या प्रजाती नष्ट होत आहेत. तरी त्यासाठी राष्ट्रीय उद्यांनाची व अभयारण्याची गरज निर्माण झाली आहे. म्हणून भारताप्रमाणे ब्राझीलमध्येही प्राणी व वनसंवर्धनाची गरज आहे.

**प्र.६ अ) खालील तक्ता पूर्ण करा. (कोणतेही तीन)**

| अ.क्र. | वनांचा प्रकार | गुणधर्म | भारतातील प्रदेश | ब्राझीलमधील प्रदेश |
|---|---|---|---|---|
| १. | उष्ण कटिबंधीय वने | १. रुंदपर्णी सदरहरित वने | १. अंदमान आणि निकोबार बेटे<br>२. पश्चिम घाट | ॲमेझोन नदीच्या खोऱ्यात |
| २. | निम वाळवंटी काटेरी वने | १. ७० सेमीपेक्षा कमी पाऊस असलेल्या प्रदेशात, नैसर्गिक वनस्पतींमध्ये काटेरी झाडे आणि झुडुपे असतात.<br>२. बाभुळ, पाम, युफोरबिया, आणि निवडुंग ह्या मुख्य वनस्पती आहेत. | १. राजस्थानचा वाळवंटी प्रदेश, उत्तर गुजरात,<br>२. मध्यपदेशाचा पश्चिम भाग | सॅव्हाना प्रदेश |
| ३. | सॅव्हाना | तुरळक झुडुपांसारखी झाडे / तुरळक झुडुपे व अवर्षण प्रतिकारक गवत | तमिळनाडू राज्याचा किनारी भाग | माटोग्रासो दो सुल गोईआस, टॉकॅन्टिस |
| ४. | उष्णकटिबंधीय निम पानझडी | मिश्र स्वरुपाच्या वनस्पती | हिमालयाच्या पायथ्याशी | |
| ५. | गवताळ प्रदेश | अर्जेंटिनातील पंपास प्रमाणे गवताळ प्रदेश | आसाम, नागालँड, मणिपूर | रिओ ग्रांड दो सुल, टोकॅन्टिस, गोईआस, ब्राझिलिया |

**किंवा**

**आ)भारत आणि ब्राझील यांच्यातील व्यापाराचा आलेख दिला आहे. त्याचे वाचन करुन पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)**

१) २०१२ या वर्षी भारताने ब्राझीलकडून आयात केलेले मुल्य ब्राझीलला निर्यात केलेल्या मूल्यापेक्षा अधिक होते.

२) २०१४ या वर्षी भारताचे ब्राझीलशी झालेले व्यापार संतुलन सर्वात अनुकुल होते

३) भारताची ब्राझीलला झालेली निर्यात २०१३ साली ३००० होती, तर भारताची ब्राझीलला झालेली आयात सन २०१३ साली ६००० पेक्षा जास्त होती.

४) २०१४ या वर्षापासून भारताच्या निर्यातीचे मूल्य ब्राझीलकडून झालेल्या आयातीच्या मूल्यापेक्षा जास्त आहे.

**प्र.७ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

१) १) प्राकृतिकरचनेचाअंतर्गतजलवाहतूकीवरपरिणामहोतो.

२) देशातीलप्राकृतिकरचनासमतल, मैदानीअसेलतरतेथूनवाहणाऱ्या नद्या संथ वाहतात.

३) देशातील नद्या बारमाही वाहत असतील तर त्या नद्यांचा अंतर्गत जलवाहतूकीसाठी उपयोग होतो.

४) धरणांपासून कालवे काढलेली असतील तर त्याचाही उपयोग जलवाहतूकीसाठी होतो.

५) ॲमेझॉन नदीचा अंतर्गत जलवाहतूकीसाठी उपयोग होतो, जगातील सर्वात लांब पल्ला या मार्गाने गाठला आहे.

६) भारतात १४५०० किमी लांबीचे अंतर्गत जलमार्ग आहे.

७) भारतात केरळमधील पश्चजल याचा देशांतर्गत जलवाहतूकीसाठी उपयोग होतो.

२) १) कचरा व्यवस्थापन हे अत्यंत महत्वाचे आहे.

२) क्षेत्रभेटी दरम्यान बसमध्ये सुद्धा कचरा व्यवस्थापन करावे लागेल. मुलांनी आणलेला खाऊ व त्यासाठी वापरलेले कागद किंवा प्लास्टिक एका पिशवित जमा करु.

३) मुलांना सूचना देऊन चॉकलेट किंवा कोणताही पदार्थ खाल्ला तर शक्यतो तो कचरा गाडीतून खाली न टाकता आपल्या बॅगमध्येच ठेवावा.

४) क्षेत्रभेटीच्या ठिकाणी कचरा टाकण्यासाठी जी व्यवस्था केली असेल तेथे तो सर्व कचरा टाकू.

५) बसमध्ये कचऱ्यासाठी एक पिशवी ठेवू जेणेकरून सर्व मुले तो कचरा त्याच पिशवीमध्ये टाकतील.

६) पर्यावरणाची कोणतीही हानी होणार नाही असेच आपले वर्तन असले पाहिजे अशा सूचना विदयार्थ्यांना देऊन कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करु.

३) १) भारताच्या शेजारील राष्ट्रांपैकी चीन वगळता सर्व राष्ट्रे भारतापेक्षा लहान आहे.
२) मालदीव हे सर्वांत लहान राष्ट्र आहे.
३) नेपाळ व भूतान ही नैसर्गिक सौंदर्याने नटलेली आहेत.
४) पाकिस्तान व बांग्लादेश ही दोन्ही भारतासारखी कृषीप्रधान आहेत.
५) म्यानमार या राष्ट्राशी पूर्वीपासून व्यापारी संबंध आहेत.
६) इंडोनेशिया हे राष्ट्र अनेक लहान-मोठ्या बेटांचा समुदाय आहे.
७) तमिळनाडू व श्रीलंका यांत पूर्वीपासून सांस्कृतिक संबंध आहेत.

४) भारत:
१) भारताचे हवामान मान्सून प्रकारचे आहे.
२) भारताच्या मध्यातून कर्कवृत्त जाते त्यामुळे सूर्याची किरणे लंबरूप पडतात. त्यामुळे वर्षभर भारतात तापमान जास्त असते.
३) भारतात तापमान दक्षिणेकडे वाहत जाते.
४) अक्षवृत्तीय व रेखावृत्तीयय विस्तारामुळे भारतात हवामानात विविधता आढळते.
५) हिंदी महासागराचा व हिमालयाचा भारताच्या हवामानावर चांगला परिणाम होतो. कारण त्यामुळे पाऊस पडतो.
६) अनियमित पाऊस, दुष्काळ, चक्रीवादळे, पूर इत्यादी नैसर्गिक आपत्तींचा सामना करावा लागतो.

ब्राझील:
१) ब्राझीलचा अक्षवृत्तीय विस्तार जास्त असल्यामुळे हवामानात विविधता आढळते.
२) विषुववृत्ताजवळ हवामान उष्ण तर मकरवृत्ताजवळ समशीतोष्ण हवामान आढळते.
३) पूर्वीय व्यापारी वाऱ्यांपासून या देशात पाऊस पडतो.
४) अजस्त्र कड्यामुळे समुद्रावरून येणारे वारे अडविले जातात. त्यामुळे तेथे प्रतिरोध पर्जन्य पडतो.
५) ब्राझीलच्या किनारी भागात चक्रीवादळे निर्माण होतात.
६) अनियमित पाऊस, दुष्काळ, चक्रीवादळे, पूर इत्यादी नैसर्गिक आपत्तींचा सामना करावा लागतो.

*This question paper is for practice purpose only.